## प्रशासकीय ठराव दिनांक ३.१०.२००२.

विषय क्रमांक १: भारतीय विज कामगार सहकारी पतसंस्था मर्या. खापरखेडा चे रूपये ५०.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा मागणी अर्जबाबत.

ठराव क्रमांक १: विषयांकीत संस्थेचे रूपये ५०.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा मागणी अर्जावर निर्णय होऊन बँकेचे कर्जधोरणानुसार व कार्यालयीन शिफारशीनुसार संस्थेला सभासदांना कर्ज वाटपासाठी रूपये १५.०० लाख (अक्षरी रूपये पंधरा लाख) फक्त कॅश क्रेडीट मर्यादा दिनांक ३०।९।२००३ पर्यंतचे मुदतीसाठी खालील अटीवर मंजुर करण्यांत आली.

अटी:- १) संस्थेने रूपये १.५० लाख रकमेची मुदती ठेव बँकेत ठेवावी/लागेल.

२) संस्थेची बँकेमधील मुदती ठेव रूपये १०.०० लाख व बचत फंड गुंतवणुक रूपये १९४९४१/- व यावर मिळणाऱ्या व्याजासह रकमेवर बँक कर्जाचा स्थायी बोझा निर्माण करून देण्या बाबत संस्थेचे संस्थेचे संचालक मंडळाचा ठराव घेऊन रूपये १००/- चे स्टँप पेपरवर करार करून द्यावा.

प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक २: चपराशी श्रेणीतून पुर्ववत ड्रायव्हर श्रेणीत घेणेबाबत श्री सुदाम नामदेवराव अतकरे यांचे अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक २: श्री सुदाम नामदेवराव अतकरे यांनी बँकेचे आस्थापनेत दिनांक १.१.१९८८ पासून ड्रायव्हर म्हणून नियुक्ती देण्यांत आली होती. सन १९९१-९२ चे कालावधीत बँकेत गाड्यांची संख्या कमी व ड्रायव्हरची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त झाल्याने, श्री अतकरे यांना त्यांना त्यांचे प्रकृतीस्तव आकस्मिकपणे घ्याव्या लागणाऱ्या रजेमुळे ड्रायव्हरची ड्युटी करण्याची दाखवून चपराशी श्रेणीत नोकरीत सामावून घेणेकरिता केलेल्या विनंती अर्जावरून दिनांक २६.६.१९९४ चे आदेशान्वये आवश्यकता पडल्यास ड्रायव्हरचे काम करण्याचे अटीवर त्यांना चपराशी श्रेणीत घेण्यांत आले होते. तेव्हापासून श्री अतकरे चपराशी श्रेणीत काम करीत असून बँकेला आवश्यकता पडल्यास ड्रायव्हरचे काम करीत आहेत.

श्री अतकरे यांनी चपराशी श्रेणीतून ड्रायव्हर श्रेणीत काम करण्याची इच्छा प्रदर्शित करून ड्रायव्हर श्रेणीत घेणेकरिता

विनंती अर्ज केला आहे. सद्यःस्थितीत ड्रायव्हरची ६ पदे मंजुर असून बँकेत ड्रायव्हरची संख्या पांच आहे. बँकेत सध्या ४ गाड्या आहेत. एखादवेळी ड्रायव्हर आकस्मिकपणे रजेवर गेल्यास गाड्यांवर ड्रायव्हरची अडचण निर्माण होते. श्री अलकरे यांचे ड्रायव्हींगचे काम समाधानकारक आहे.

श्री सुदाम नामदेवराव अलकरे यांना बँकेत ड्रायव्हरची आवश्यकता विचारांत घेवुन ड्रायव्हर म्हणून दिनांक २९.६.2002 पासून अखंडीत ड्रायव्हरची ड्युटि करीत असले तरी त्यांनी केलेल्या दिनांक ४.९.2002 चे विनंती अर्जाचे तारखेपासून त्यांना चपराशी श्रेणीतून ड्रायव्हर श्रेणीत घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तथापी त्यांना आकस्मिकपणे वारंवार रजा घेता येणार नाही. त्याप्रमाणे ४.९.2002 पासून श्री अलकरे यांना ड्रायव्हर श्रेणीत घेवुन ड्रायव्हर श्रेणीत त्यांचा मुळ पगार निश्चित करण्यात यावा असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

(एस. एस. गोडे) (एल. बी. पाटील)
प्रभारी व्यवस्थापक प्रशासक
दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि. नागपूर.

# प्रशासकीय ठराव दिनांक ६.१०.२००२.

विषय क्रमांक १ : बँकेतील ५१ शिपाई कर्मचारी यांचा एकत्रित पगारमानावरील कालावधी दिनांक २.१०.२००२ रोजी संपल्यामुळे नियमित वेतनश्रेणीवर घेणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १ : मा. उच्च न्यायालयाचे याचिका क्रमांक ४३२६/९६ मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून मुख्य कार्यालयाचे दिनांक ४१/2002 चे आदेशाप्रमाणे प्रति महिना रूपये १०५०/- प्रमाणे एकत्रित पगारमानावर शिपाई म्हणून नियुक्त केलेल्या ५१ शिपाई कर्मचाऱ्यांचे सुरूवातीचे सहा महिन्याचे कालावधीतील गोपनिय अहवाल प्राप्त व्हायचे असल्यामुळे वाढविण्यांत आलेला एकत्रीत पगारमानावरील कालावधी दिनांक २/१०/२००२ रोजी संपला आहे. सदर एकत्रित पगारमानावरील शिपाई कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवालानुसार कार्यालयीन कामकाजांत त्यांना मिळालेले मार्क्स श्री भोजराज पारशिवनीकर व श्री प्रमोद बागडे यांना वगळता, अनुकूल आहेत. तथापी त्यांच्या कार्यालयीन कामकाजांत सुधारणा होणेकरिता खाली नमुद केलेल्या सदर ५१ शिपाई कर्मचाऱ्यांच्या एकत्रित पगारमानावरील कालावधी पुनश्च दिनांक 2.1.2003 पर्यंत वाढविण्यांत यावा व श्री भोजराज पारशिवनीकर व श्री प्रमोद बागडे यांचे कार्यालयीन कामकाज समाधानकारक नसल्यामुळे तसेच त्यांना वारंवार रजेवर राहण्याची सवय असल्यामुळे कडक ताकीद देण्यांत यावी, असे ठरले.

| अ. क्र. | शिपाई कर्मचाऱ्याचे नाव | शाखा | एकत्रित पगारमानावर वाढविण्यांत आलेला कालावधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री अरूण लालचंद चरडे | भिवापूर | 2.1.2003 |
| २ | " अनिल संतोषराव डाफ | वाडी | —"— |
| ३. | " विठ्ठल गुलाबराव आखरे | मौदा | —"— |
| ४. | " अशोक वासुदेवराव मानकर | कामठी | —"— |
| ५. | " निळकंठ माणिकराव अवलमकर | कुही | —"— |
| ६. | " विणुक पुनालाल नागोसे | रामटेक | —"— |
| ७. | " रूकेश नामदेवराव वाघ | सावनेर | —"— |
| ८. | " युवराज आनंदराव तकीत | कळमेश्वर | —"— |

| १ | 2 | 3 | ४ |
|---|---|---|---|
| ९ | श्री. चंद्रशेखर नामदेवराव कुर्वे | नवेगांव खैरी | 2.7.2003 |
| १०. | " नंदू गणपतरावजी ढोक | मेटपांजरा | —"— |
| ११. | " विनोद भगवान मिसाळ | मोहपा | —"— |
| १२. | " भगवान दुर्गाजी नान्हे | देवळापार | —"— |
| १३ | " भोजराज कवडूजी पारशिवनीकर | जिल्हा परिषद | —"— |
| १४. | " मुरलीधर व्यंकटराव निमजे | गणेशपेठ | —"— |
| १५ | " शशिकांत जनार्दन राऊत | सावरगांव | —"— |
| १६. | " रमेश एकनाथ शेटे | गांधीबाग | —"— |
| १७. | " अरुण भाऊरावजी ठाकरे | गोन्हागांव | —"— |
| १८. | " विजय दशरथराव फुलबांधे | पिपळा केवलराम | —"— |
| १९. | " सुनिल लक्ष्मणराव अव्चू | अडेगांव | —"— |
| २० | " गणेश भाऊराव घरडे | पारडसिंगा | —"— |
| २१. | " राजकुमार विठ्ठलराव कोल्हे | कोंढाळी | —"— |
| २२ | " कमलाकर मधूकर पनसकर | मारोडी | —"— |
| २३. | " संजय संपतराव वाळके | कोराडी | —"— |
| २४. | " धनराज मारोत्तराव कडुकं | कोहळी | —"— |
| २५. | " सुरेश योगराज भैडे | मु.का. नागपूर. | —"— |
| २६ | " राजेंद्र ज्ञानदेवराव रानगीरे | वेलुर | —"— |
| २७. | " रविंद्र मारोतराव ठाकरे | मु.का.नागपूर | —"— |
| २८ | " रमेश बाबुलाल चौधरी | मु.का.नागपूर. | —"— |
| २९. | " रामभाऊ गणपतराव कुमरे | वगधेळ | —"— |
| 30 | " संजय मणिराम गजभिये | धडिवनी | —"— |
| ३१ | " अशोक आनंदराव बारापात्रे | मु.का. नागपूर. | —"— |
| 32. | " नंदलाल रामाजी बोकडे | मु.का.नागपूर | —"— |
| 33. | " प्रशांत किशनलाल सलभैय्या | महाल | —"— |
| ३४. | " नरेंद्र वसंतराव वाघमारे. | लोहारी सावंगा | —"— |
| ३५ | " अशोक महादेवराव सखवर्ते | धंतोली | —"— |
| ३६ | " रत्नदिप मारोती पाटील | मेंढला | —"— |
| ३७ | " शेखर श्रीराम नंदरधने | सक्करदरा | —"— |
| ३८. | " भास्कर मारोतराव घाडगे | बुटीबोरी | —"— |
| ३९ | " नथ्थु बाबुराव जांभूळकाटे | उमरेड. | —"— |

| | | | |
|---|---|---|---|
| ४०. | श्री. बशिर इमामभाई छवारे | खापरखेडा | २.१.२००३ |
| ४१. | " जीतेंद्र वसंतराव दरेकर | जवळी | २.१.२००३ |
| ४२. | " रामेश्वर वासुदेवराव नायकर | रामटेक | —"— |
| ४३. | " प्रकाश हेमराज खोरगडे | खापा | —"— |
| ४४. | " जावेद अब्दुल जब्बार | रिधोरा | —"— |
| ४५. | " गोविंद नामदेवराव कोंडलकर | कळमना बाजार | —"— |
| ४६. | " विनायक वासुदेव गुसारी | मांढळ | —"— |
| ४७. | " गुणवंत किसनराव चौधरी | हिंगणा | —"— |
| ४८. | " मारोती देवराव माहोकार | बेला | —"— |
| ४९. | " राजकुमार केशवराव रायपूरकर | पारशिवनी | —"— |
| ५०. | " राजु मनोहरराव चिरवाडे | सावनेर | —"— |
| ५१. | " प्रमोद संपतराव बागडे | मु.का. नागपूर. | —"— |

## प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक 2. इंक्रीमेंट बार झालेल्या कर्मचाऱ्यांना स्टॅगनेशन इंक्रीमेंट देणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक 2 : कर्मचाऱ्यांचे पगारवाढी संबंधात मा. वेज बोर्डच्या निर्णय दिनांक १.८.२००० पासून लागु करण्याचे मा० संचालक मंडळाचे दिनांक १८.६.२००० रोजीच्या सभेत ठरले. वेज बोर्डचे निर्णयानुसार विशेष पगारवाढ (स्टॅगनेशन इंक्रीमेंट) बार झाल्यानंतर १ वर्षाआड १ वार्षिक पगारवाढ शेवटचे वार्षिक पगारवाढी एवढी देण्याचे नमुद आहे. अशा वार्षिक पगारवाढी प्रत्येक श्रेणीत जास्तीत जास्त सहा वेळा देता येवु शकतात. ही बाब विचारांत घेवुन इंक्रीमेंट बार झालेल्या कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यानुसार खालील कर्मचाऱ्यांना १ वर्षाआड १ वार्षिक पगारवाढ देण्यांत यावी असे ठरले.

श्री अतकरे यांना चपराशी श्रेणीतून ड्रायव्हर श्रेणीत ड्रायव्हर म्हणून काम करणेकरिता घेण्यांत आले आहे. त्यामुळे इंक्रीमेंट बार झाले किंवा नाही ह्याबाबतीत ड्रायव्हर श्रेणीत विचार करावा.

अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांना श्री. व्ही. के. वाघाडे, शिपाई, श्री रॉबर्ट फ्रान्सीस, शिपाई यांना सतत गैरहजर असल्यामुळे व

श्री चांभारे यांची खाते चौकशी होऊन दंड झाल्यामुळे त्यांना स्टॅगनेशन इंक्रिमेन्ट देता येणार नाही, असेही ठरले.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | हुद्दा | शाखा/मु.का. |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस. के. गुंडेवार | विभागीय अधिकारी | काटोल |
| २ | " आर. एम. गुरनुले | चपराशी | मु.का. नागपूर. |
| ३. | " सी. आर. घारपूरे | —"— | —"— |
| ४. | " एन. व्ही. सातपुते | —"— | नरखेड |
| ५. | " ओ. एन. पुसदकर | —"— | मु.का. नागपूर |
| ६. | " अनिल स्टेनली | —"— | —"— |
| ७. | " ए. फिलिप्स | —"— | हिंगणा |
| ८. | " पी. सी. ताजने | शाखा व्यवस्थापक | कोहळी |
| ९. | " पी. एम. भोंदवकर | लिपिक | मु.का. नागपूर |
| १०. | " एच. पी. टेकाम | चपराशी | —"— |
| ११ | " के. डी. बनकर | —"— | —"— |
| १२. | " आर. सी. जेरिकर | —"— | —"— |
| १३. | " के. एल. धोटे | —"— | कामठी |
| १४ | " व्ही. पी. बैलुले | —"— | खापरखेडा |
| १५. | " पी. एम. हुके | —"— | जिल्हा परिषद |
| १६ | " व्ही. एन. क्षिरसागर | —"— | सीसी |
| १७ | " डी. पी. थुल | —"— | मु.का. नागपूर. |

## प्रशासकीय ठराव मंजुर

**विषय क्रमांक ३:** मे. मुरली ॲग्रो प्रोडक्टस लि; नागपूरचे मौजा वडोदा येथील न्युज प्रिंट पेपर युनिटकरिता कच्चा माल आयात करण्यासाठी राज्य सहकारी बँकेमार्फत एल.सी. सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.

**ठराव क्रमांक ३:** मे. मुरली ॲग्रो प्रॉडक्टस लि; नागपूर यांचे मौजा वडोदा तालुका कामठी जि. नागपूर येथील न्युज प्रिंट पेपर युनिटकरिता विदेशातून कच्चा माल (वेस्ट पेपर) आयात करण्यासाठी रूपये ३००.०० लाख पत पत्र (एल. सी.) मर्यादा दिनांक २८.१२.२००१ चे मा. कर्ज उपसमिती सभेत मंजुर झालेली

आहे. या अनुषंगाने बँकेचे पतपत्र (एल.सी.) मर्यादा मंजुरीबाबतचे पत्र क्रमांक कर्ज विभाग/बि.शे./2001-2002/ 6650 दिनांक 4.9.2002 नुसार कंपनीने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. या मर्यादे-अंतर्गत कंपनीला वेळोवेळी विदेशातून कच्चा माल (वेस्ट पेपर) आयात करावा लागणार आहे. त्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई येथून कंपनीला वेळोवेळी एल.सी. मंजुरी द्यावयाची असल्याने एल.सी. द्वारे मागविलेल्या मालाची 110 टक्के प्रमाणे येणारी रक्कम महाराष्ट्र राज्य सह. बँकेला वेळोवेळी उपलब्ध करून देण्याची हमी आपल्या बँकेला द्यावी लागेल. व त्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई येथील आपले बँकेच्या चालु ठेव खात्यावर एल.सी. पोटी रक्कम अदा करण्याबाबत राज्य सहकारी बँकेला अधिकार द्यावे लागतील व याकरिता आपले बँकेचा प्रशासकीय ठराव पारित करणे आवश्यक आहे.

Resolved that :-

1) At the request of M/s Murli Agro Products Ltd, Nagpur and in terms of sanction accorded by bank joint and several guarantee be issued in favour of The Maharashtra state Cooperative Bank Ltd., Mumbai against the doucumentary credit to be issued by the later up to Rs. 300.00 Lacs (Rs. Three crore only) — equivalent to letters of credit established by them.

2) The Maharashtra state Cooperative Bank Ltd, Mumbai is authorised to debit current account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any incurred under the documentary credits to be established from time to time within a above said limit.

3) Any two of the following persons are author ised to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| Sr.No. | Name | Designation. |
|---|---|---|
| 1) | Shri L.B. Patil | Administrator. |
| 2) | Shri S.S. Gode | Manager (officg) |
| 3) | Shri C.N. Doiefode | Chief officer. |
| 4) | Shri A.B. Deshmukh | Chief officer. |

4) Any one of the following persons is authorised to countersign documents issued by the applicant for the credit.

| Sr.No. | Name. | Designation |
|---|---|---|
| 1) | Shri L.B. Patil | Administrator |
| 2) | Shri S.S. Gode | Manager (officg) |
| 3) | Shri C.N. Doiefode | Chief officer |
| 4) | Shri A.B. Deshmukha | Chief officer. |

## प्रशासकीय ठराव मंजुर.

विषय क्रमांक ४ : केंद्र शासनाचे कॅपिटल इंव्हेस्टमेंट सबसिडी योजने अंतर्गत ग्रामीण भागांत गोदाम बांधणीसाठी कर्ज धोरण मंजुरीबाबत.

ठराव क्रमांक ४ : नाबार्डचे परिपत्रक क्रमांक १२/आयसीडी-20/2002-2003 दिनांक १२ एप्रिल २००२ नुसार ग्रामीण भागांत गोदामे बांधण्यासाठी/नुतनीकरणासाठी/विस्तृतीकरणासाठी कॅपिटल इनव्हेस्टमेंट सबसिडि योजनेअंतर्गत प्रकल्प रकमेचे २५ टक्के नाबार्डकडून केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार असून २५ टक्के लाभार्थीला स्वगुंतवणुक करावयाची आहे उर्वरित 50% कर्ज वित्तीय संस्थेला उपलब्ध करून द्यावयाचे आहे. सदर योजना शासनाचे स्तरावर राबविल्या जात असून जिल्ह्यामधील सहकारी संस्थांची कर्ज प्रकरणे मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडून प्राप्त होत आहेत त्यानुसार कर्ज मंजुरीसाठी कर्ज धोरण ठरवावे.

लागेल.

ठराव - "केंद्र शासनाचे कॅपिटल इनवेस्टमेंट सबसिडी योजने अंतर्गत ग्रामिण भागांत गोदाम बांधणीसाठी/नुतनीकरणासाठी/विस्तृतीकरणासाठी जिल्ह्यातील सहकारी संस्था व कृषि उत्पन्न बाजार समिती यांना कर्ज पुरवठा करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्ज धोरणास कार्यालयीन टिपणीनुसार मंजुरी देण्यांत येते.

कर्ज धोरण - केंद्र शासनाचे कॅपिटल इनवेस्टमेंट सबसिडी योजने अंतर्गत ग्रामिण गोदाम योजना अंतर्गत गोदाम बांधणीसाठी कर्ज धोरण- केंद्र शासनाने धान्य व कृषि उत्पादनाच्या साठवणुकीसाठी ग्रामिण भागांत गोदामे बांधण्यासाठी योजना जाहिर केली आहे. या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून अनुदान मिळणार आहे. सदर कर्ज पुरवठा सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समिती यांना करण्यांत येईल.

१. कर्ज मिळण्यासाठी पात्रता :

१. सहकारी संस्था/कृषि उत्पन्न बाजार समिती बँकेची रितसर सभासद झालेली असावी.

२. संस्थेकडे कर्ज थकित नसावे.

3. गोदामाचा वापर आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबत बँकेचे समाधान करून द्यावे लागेल.

४.) अकृषक झालेली (नॉन ॲग्रीकल्चर) गोदाम बांधकामाची जागा संस्थेच्या मालकीची असावी. मालकी हक्काचे दस्तऐवज सादर करावे लागेल.

५. संस्थेचे कामकाजांत/आर्थिक व्यवहारांत अनियमितता नसावी.

६. संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी.

७. संस्थेचे किमान २ वर्षापर्यंतचे ऑडीट झाले असावे. ऑडिट वर्ग अ किंवा ब असावा.

८. गोदाम बांधल्यानंतर साठवणुकीसाठी बारमाही उपलब्ध होणारा माल, त्यापासून संस्थेला मिळणारे उत्पन्न, उत्पन्नामधून बँकेचे कर्जावरील व्याज, कर्ज हप्ता रकमेची परतफेड, देखभाल, नोकरांचा पगार इत्यादि बाबी विचारांत घेउन प्रोजेक्ट रिपोर्ट मा० जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांना सादर

करून प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त करून घ्यावी लागेल.

९. कर्ज रकमेच्या किमान २५% रक्कम संस्थेला स्वगुंतवणूक करावी लागेल. स्वगुंतवणुकीची रक्कम संस्थेजवळ उपलब्ध असावी.

१०. गोदाम महानगरपालिका क्षेत्राबाहेर ग्रामिण भागातच बांधावे लागेल.

११. गोदामाची क्षमता किमान १०० मे.टनापेक्षा कमी अथवा १०,००० मे.टनापेक्षा जास्त नसावी.

१२. गोदाम बांधकामाच्या आराखडा, प्रकल्प अहवाल, प्रकल्पाचा खर्च इत्यादि कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणीत करून सादर करावी लागेल.

१३. संस्थेची वार्षिक आर्थिक उलाढाल पाहुनच कर्ज मंजुर केल्या जाईल. संस्था व बँक कर्जात अनिष्ट तफावत असलेल्या संस्थेला कर्ज मंजुर केले जाणार नाही.

१४. गोदाम ज्या कार्यक्षेत्रामध्ये बांधल्या जाणार आहे, तेथील ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र व बांधकामाचा मंजुर केलेला नकाशा असावा.

१५. सदर कर्जाचे सुरक्षिततेकरिता योजने अंतर्गत निर्माण होणारी संपूर्ण मालमत्ता, जमिन व बांधकाम बँकेला रजिस्टर्ड गहाण करून द्यावे लागेल. याशिवाय जरुरत असल्यास सहतारण म्हणून संस्थेची इतर स्थावर मालमत्ता बँकेच्या गहाणात मागण्याचा अधिकार बँकेला राहील.

२. <u>निधी उपलब्धता व कर्ज पुरवठा</u>

१. संस्थेला प्रकल्प खर्चाचे २५% रक्कम स्वनिधी खर्च करावा लागेल. यामध्ये जागेची किंमत विचारात घेतली जाईल. मात्र या भागातील जागेची किंमत किंवा प्रकल्प खर्चाचे १० टक्के रक्कम यामध्ये कमी असणारी रक्कम विचारांत घेण्यांत येईल.

२. शासकीय अनुदान २५ टक्के - शासकीय अनुदान २५ टक्के (शासकीय अनुदान गोदाम बांधनीनंतर प्राप्त होणार असल्याने प्रथमतः संस्थेनी गुंतवणुक करावी. संस्थेला शक्य नसल्यास बँक तेवढ्या रकमेचे मध्यम मुदत कर्ज देईल)

३. बँक कर्ज ५० टक्के.

3. गोदामाचे बांधकाम :

गोदामाचे बांधकाम अभियांत्रीकी दृष्टीकोनातून सक्षम व कृषि मालाच्या साठवणुकीसाठी योग्य असावे.

१. गोदामाचे बांधकाम केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग / राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे निकषानुसार व निर्देशानुसार असल्याचे प्रमाणपत्र संस्थेच्या तांत्रिक सल्लागाराने प्रकल्प अहवालासोबत जोडलेले असावे.

२. गोदामाकडे जाण्यासाठी रस्ते, अंतर्गत पक्के रस्ते इत्यादि आवश्यक सोयी असाव्यात.

3. गोदामाच्या शासकीय वापरासाठी राज्य वखार महामंडळाच्या कायदा व इतर संबंधीत कायद्यानुसार परवाना संस्थेनी घेतलेला असावा.

४. फक्त सहकारी संस्थांना जुन्या गोदामाचे नुतनीकरण करण्यासाठी व विस्ताराकरिता देखील कर्ज उपलब्ध होवु शकेल.

४. मुदती कर्ज :

१. प्रकल्प खर्चाचे ५० टक्के रक्कम बँकेचे मुदती कर्ज राहील. अनुदान २५% (प्रकल्प खर्चाचे) मिळणार आहे. अनुदान बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मिळणार असल्याने (बॅकइंडेड सबसिडी) अनुदानास पात्र असलेली २५ टक्के रक्कम लाभार्थीला स्वत: खर्च करावी लागेल. संस्था ही रक्कम खर्च करण्यास संस्था सक्षम नसल्यास मा. जिल्हा उपनिबंधक यांचे परवानगीने तेवढ्या रकमेचे मुदती कर्ज बँकेकडून उपलब्ध करुन दिल्या जाईल.

५. व्याज दर व परतफेडीचे हप्ते :

१. बांधकाम एक वर्षात पूर्ण करावयाचे आहे. या काळात व्याज आकारणी करुन व्याज बाजुला ठेवण्यांत येईल.

२. बांधकाम पूर्ण झाल्यावर प्रथम दोन सहामाही हप्तांत व्याजाची वसुली करण्यांत येईल.

3. उर्वरित ९ वर्ष १८ सहामाही हप्तांत मुद्दलाची व व्याजाची रितसर परतफेड करावी लागेल.

४. या ११ वर्ष मुदतीचे आंत (१०+१) कर्जासाठी १४ टक्के व्याजदर राहील. सहामाही मुद्दलाचा हप्ता थकित झाल्यास एक टक्का दंड व्याज आकारण्यांत येईल.

५. येणारी वसुली प्रथम दंड व्याजांत, व्याजांत, थकित मुद्दलांत व चालु मुद्दलांत या पध्दतीने घेतली जाईल.

६. <u>प्रशिक्षण</u> :

ज्या संस्थेला गोदाम कर्ज मंजुर करावयाचे आहे अशा संस्थेने कर्मचाऱ्यांना गोदाम व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

७. <u>विमा</u> :

गोदामाचा विमा संस्थेला स्वखर्चाने काढावा लागेल.

८. <u>कर्ज वितरण कार्यपध्दती</u> :

१. संस्थेच्या प्रकल्प अहवालास मंजुरी प्राप्त झाल्यावर तसेच बँकेनी गोडाऊन मध्यम मुदती कर्ज मंजुर केल्यानंतर संस्थेला टेंडर पध्दतीने गोडाऊन बांधकाम करुन घ्यावे लागेल.

२ संस्था यासाठी आवश्यक उपाय योजना करील व त्यात टेंडर छपाई करणे, जाहिरात देणे, टेंडर वितरण करणे, आलेले टेंडर गोळा करणे टेंडर फोडण्याची तारीख व वेळ ठरविणे इत्यादि कामाच्या समावेश राहील. यासाठी संस्थेला तांत्रिक सल्लागार (आर्कीटेक्ट) नेमावा लागेल. व यासाठी होणारा खर्च संस्थेला करावा लागेल. यासाठी कर्ज रकमेचा विनियोग करता येणार नाही.

३. वरील २ प्रमाणे व्यवस्था करण्यास संस्थेला अडचण असेल व संस्थेनी त्याप्रमाणे ठराव घेतला असेल तर संस्थेच्या ठरावातील तरतुदीप्रमाणे टेंडर बाबीच्या आवश्यक पुर्ततेसाठी बँकेकडून मार्गदर्शन देण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

४. टेंडर काढण्याच्या प्रक्रियेत संस्थेनी ठरावासहीत पाठविलेला प्रतिनिधी, बँकेने नेमून दिलेला प्रतिनिधी कर्ज देणाऱ्या बँकेचा प्रतिनिधी व मा. जिल्हा उपनिबंधक यांचा प्रतिनिधी यांचा समावेश राहील व टेंडर काढण्याच्या आणि मंजुरीच्या पूर्ण प्रक्रियेला बँक व मा. जिल्हा उपनिबंधक यांची आगावू मान्यता घेउन कार्यक्रमाची आखणी संस्थेला करावी लागेल.

५. टेंडर मंजुरी प्रक्रियेत संस्थेनी ठरावासहीत पाठविलेला प्रतिनिधी बँकेने नेमुन दिलेला प्रतिनिधी व मा. जिल्हा उपनिबंधक यांचा समावेश राहील व संयुक्त सहीने टेंडर मंजुरी देण्यांत येईल व यानंतर लाभार्थी संस्थेला वर्क ऑर्डर देता येईल.

६. मंजुर मध्यम मुदती कर्जापेक्षा टेंडर मंजुरीची रक्कम जास्त असेल तर शासनाचे अनुदानाचे रकमेशिवाय येणाऱ्या जास्त रकमेस सहकारी संस्थेला ५० टक्के व बँकेला ५० टक्के सहभाग घ्यावा

लागेल. म्हणजे ५० टक्के रक्कम संस्थेला स्वनिधितून उभी करावी लागेल व बँक ५० टक्के मध्यम मुदती कर्ज उपलब्ध करून देईल.

७. बांधकामाच्या १ ला टप्पा २५ टक्के रकमेच्या संस्थेच्या स्वनिधिमधून राहील. २५ टक्के स्वनिधिची रक्कम खर्च झाल्यावर व तसे विनियोग प्रमाणपत्र बँकेस प्राप्त झाल्यावर उर्वरित समान ३ टप्प्यांत बँक कर्ज निधी उपलब्ध करून देईल. यासाठी संस्थेला ठरावासह बांधकामाचे बील आर्कीटेक्टचे तपासणी शिफारशीसह बँकेस सादर करावे लागेल. टेंडर मंजुरीचे तरतुदीप्रमाणे बँक आलेल्या बिलाची छाननी करून कर्ज मंजुरीतील तरतुदीप्रमाणे संस्थेला/ठेकेदाराला रक्कम उपलब्ध करून देईल.

८. गोडाऊनचे अंतिम टप्प्याचे बांधकाम झाल्यावर काम पूर्ण झाल्याचा आर्कीटेक्टचा दाखला संस्थेला ठरावासह सादर करावा लागेल. व त्याप्रमाणे निरिक्षण समितीचा अहवाल, विहित अटी व शर्तीचे पालन याचे आधारे निरिक्षण समितीच्या शिफारशीनुसार बील मंजुर करण्यांत येईल.

९. <u>नियंत्रण</u>:

१. बँकेचे इंजिनियर बांधकामाची तपासणी करतील. त्यांचे शिफारशीनुसार कर्ज रक्कम अदा केली जाईल.

२. मा. कृषि विपणन सल्लागार यांचे विभागीय कार्यालयामार्फत प्रकल्पावर नियंत्रण ठेवल्या जाईल.

३. मा. कृषि विपणन सल्लागार यांनी नियुक्त केलेली समिती प्रकल्पावर नियंत्रण ठेवील व त्यांनी दिलेल्या अहवालानुसार लाभार्थी/बँक/नाबार्ड कार्यवाही करेल.

४. अनुदानाची संपूर्ण रक्कम अदा केल्यानंतर विनियोग प्रमाणपत्र बँकेनी नाबार्डला सादर करावयाचे आहे.

५. गोदाम बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक नकाशा इत्यादि बाबी तसेच बांधकामाबाबत होत असलेली प्रगती या बाबींवर बँकेचे कृषि अभियंता यांनी नियंत्रण ठेवून वेळोवेळी बँकेकडे प्रगती अहवाल सादर करावा लागेल.

१०. <u>अनुदान</u>:

अ) संस्थेने कर्जासाठी बँकेकडे करावयाचे अर्जाची एक प्रत प्रकल्प अहवाल कागदपत्रासह मा. कृषि विपणन सल्लागार यांच्या विभागीय कार्यालयास पाठवावी.

ब) बँकेने कर्जमंजुरीनंतर कर्जाचा पहिला हप्ता अदा केल्यानंतर बँकेने नाबार्डकडे अर्ज करावा व त्यासोबत बँक कर्ज मंजुरीपत्र जोडावे. एक प्रत कृषि विपणन सल्लागार, विभागीय कार्यालयास द्यावी.

क) नाबार्डकडून अनुदानाची रक्कम मंजुर होवुन आल्यानंतर बँक लाभार्थीनुसार बँक 'सबसिडी रिझर्व फंड अकाउंट' मध्ये रक्कम जमा करेल.

३) प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर बँक, नाबार्ड व कृषि विपणन सल्लागार यांचे अधिकाऱ्यांची समिती गोदामाची तांत्रिक व आर्थिक तपशिलानुसार तपासणी करून अहवाल देईल व त्यानुसार बँक नाबार्डकडे अंतिम अनुदानासाठी अर्ज सादर करेल.

४) लाभार्थीस मिळालेले अनुदान बँकेमध्ये सबसिडी रिझर्व फंड अकांउट मध्ये जमा असल्याने कर्ज रकमेतून जमा अनुदानाची रक्कम वजा करुन उर्वरित कर्ज रक्कमेवरच बँक व्याज आकारेल.

प्रशासकीय ठराव मंजुर

विषय क्रमांक ५ : बचत ठेव खात्यावर वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ५ : वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा योजनेअंतर्गत ओव्हर ड्राफ्ट कर्ज मर्यादा नुतनीकरणासाठी अर्ज आलेले आहेत. बँकेचे कर्ज धोरणानुसार सभासदांना रुपये १.०० लाखापर्यंत त्यांचे बचत ठेव खात्यावर एक वर्षाकरिता ओव्हर ड्राफ्ट कर्ज मर्यादा मंजुर केल्या जातात. व पुढे दरवर्षी सभासदाला मंजुर असलेल्या कर्ज मर्यादेचे नुतनीकरण केले जाते. तरी त्यानुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय ठराव करण्यांत येत आहे.

- प्रशासकीय ठराव -

वैयक्तीक ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादा योजने अंतर्गत यापूर्वी मंजुरी दिलेल्या कर्ज प्रकरणांपैकी ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादेचे नुतनीकरण मंजुरीसाठी २२ शाखांकडून प्राप्त झालेले एकुण २०५ सभासदांचे रुपये ८४३३५५५०.०० रकमेचे ओव्हरड्राफ्ट कर्ज मर्यादांना खाली दर्शविल्याप्रमाणे पुढील एक वर्षाकरिता नुतनीकरणास मान्यता देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | शाखा | सभासद संख्या | नुतनिकरण मंजुर केलेली मर्यादा | मुदत. |
|---|---|---|---|---|
| १. | पवनी | ६ | २,४६,००० | ३१.१०.2003 |
| २. | पाटणसावंगी | 3 | ८९,००० | 30.09.2003 |
| 3. | दिघोरी स्टेशन | २ | ६६,००० | 30.09.2003 |
| ४. | मोहपा | ८ | ५,२९,००० | 30.09.2003 |
| ५. | मौदा | ५ | २,६३,१५० | ३१.०८.2003 |
| ६. | रामनगर | १२ | ७४९००० | ३१.०८.2003 |
| ७. | अरोली | ४ | ११३२०० | ३१.०८.2003 |
| ८. | गणेशपेठ | ३ | १३६२०० | ३१.०७.2003 |
| ९. | रामटेक | १६ | ७६६६०० | ३१.०८.2003 |
| १०. | अडेगांव | ३ | १४३००० | ३१.१०.2003 |
| ११. | खात | २ | ७६६०० | 30.09.2003 |
| | | ५ | २०६००० | ३१.१०.2003 |
| १२. | बेसुर | २ | ६६००० | 30.09.2003 |
| १३. | नांदागोमुख | ५ | ९६००० | 30.09.2003 |
| १४. | पारशिवनी | १२ | ४६६६०० | 30.09.2003 |
| | | ६ | २३९००० | ३१.०७.2003 |
| १५. | रेवराळ | ३ | १०२००० | 30.06.2003 |
| १६. | रामनगर | २७ | १०१४८०० | 30.09.2003 |
| १७. | नवेगांव खैरी | २ | ५०००० | 30.09.2003 |
| १८. | मांढळ | १ | ५५००० | ३१.१.2003 |
| | | ८ | २६६००० | २८.२.2003 |
| | | ९ | ३४९६०० | ३१.03.2003 |
| | | ५ | २०८००० | 30.04.2003 |
| | | 2 | ७९००० | ३१.०५.2003 |
| | | 2 | ५७८०० | 30.06.2003 |
| | | 2 | ६०००० | ३१.०७.2003 |
| | | १ | ४०००० | ३१.०८.2003 |
| | | 2 | ५०८०० | 30.09.2003 |
| १९. | येनवा | 2 | ४७६०० | 30.09.2003 |
| २०. | तारसा | १ | ६७००० | ३१.१०.2003 |
| २१. | हनुमाननगर | ४१ | १६५७६०० | 30.09.2003 |
| २२. | मारोडी | 3 | ११७००० | ३१.१०.2003 |
| | एकूण बेरीज | २०५ | ८४९९५५० | |

प्रशासकीय ठराव मंजूर

विषय क्रमांक ६: महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या., उमरेडचे रुपये १५.०० लाख कॅश क्रेडीट मर्यादा नुतणीकरण मागणी अर्जाबाबत.

ठराव क्रमांक ६: महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. उमरेडचे कॅश क्रेडीट मर्यादा नुतनीकरण मागणी अर्जावर निर्णय होऊन, संस्थेला सभासदांना कर्ज वाटपासाठी मंजुर असलेल्या रुपये १५.०० लाख (अक्षरी रुपये पंधरा लाख) फक्त कॅश क्रेडीट मर्यादेचे दिनांक ३०।९।२००३ पर्यंतचे मुदतीसाठी खालील अटीवर नुतनीकरण मंजुर करण्यांत आले आहे.

अट: शिल्लक बचत फंड रुपये १११४३८/- बँकेत गुंतवावा लागेल व्याजासह कर्ज खात्यावर उचल मिळेल.

प्रशासकीय ठराव मंजुर

(एस.एस. गोंडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल. बी. पाचिले)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

५६

## प्रशासकीय ठराव दिनांक ११.१०.२००२

विषय क्रमांक १ : एक रकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत ३१/३/2002 नंतर वसुली भरणारे सभासदास रुपये ४.१७ लाख तडजोडीची रकमेचा जमाखर्च घेण्याबाबत.

ठराव क्रमांक १ : मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक अर्थ-२/ओ.टी.एस./02, दिनांक ३.७.2002 तसेच नाबार्ड यांचे पत्र क्रमांक NB.PCD(ODR)/599/A,131/(OTS)/2002-03/ दिनांक १४.६.2002 नुसार एक रकमी परतफेड योजनेचा दि.30/९/2002 पर्यंत मुदतवाढ देण्यांत आली आहे.

त्यानुसार दि.30.९.2002 पर्यंत आलेल्या प्रकरणांवर दिनांक ३१.१२.२००२ पर्यंत बँकेला निर्णय घ्यावयाचा असल्याने बँकेने पत्र क्र. कर्ज विभाग/वसुली/2002-03/223४ दिनांक २२.७.२००२ ला परिपत्रक काढून सर्व शाखांना मुदतवाढ दिल्याबाबत कळविले. त्यानुसार शाखेकडून प्राप्त झालेली खालील १८ संस्थांचे ६१ सभासदांना रक्कम रुपये ४.१७ लाख रकमेचा जमाखर्च घेण्याबाबत अनुमती देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | तालुका | शाखा | संस्थेचे नांव | सभासद संख्या | सभासदांना सवलत पत्र रक्कम | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ | ७. |
| १. | रामटेक | रामटेक | काचुरवाही सेवा सो. | ११ | १.६४ | |
| २. | कुही | वेलतुर | सोर्सी (बिर्वे) सेवा सो. | ३ | ०.२७ | |
| ३. | पारशिवनी | कन्हान | निलज सेवा सो. | २ | ०.१२ | |
| ४. | पारशिवनी | कन्हान | टेकाडी सेवा सो. | १ | ०.०१ | |
| ५. | कायल | कायल | खानगांव सेवा सो. | ६ | ०.१० | |
| ६. | मौदा | मौदा | मौदा सेवा सो. | १ | ०.१० | |
| ७. | मौदा | मौदा | माथनी सेवा सो. | १ | ०.०५ | |
| ८. | मौदा | गोवरी | गोवरी सेवा सो. | ३ | ०.०९ | |
| ९. | मौदा | चाचेर | येरला सेवा सो. | १ | ०.०५ | |
| १० | मौदा. | चाचेर | निमखेडा से.सो. | १ | ०.१० | |
| ११. | मौदा | अरोली | अरोली से.सो. | ५ | ०.३७ | |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
|---|---|---|---|---|---|---|
| १२. | मौदा | रेवराल | खंडाळा (पिपरी) से.सो. | ५ | ०.१९ | |
| १३ | मौदा | मारोडी | सिंगोरी सेवा सो. | १ | ०.१९ | |
| १४. | मौदा | धानला | धानला सेवा सो. | १० | ०.६४ | |
| १५. | मौदा | धानला | पिपरी सेवा सो. | ४ | ०.१४ | |
| १६. | मौदा | धानला | दहेगांव सेवा सो. | ३ | ०.०७ | |
| १७. | मौदा | धानला | चारभा सेवा सो. | १ | ०.१० | |
| १८. | मौदा | धानला | निहारवाणी से.सो. | २ | ०.०१ | |
| | | | एकुण | ६१ | ४.१७ | |

प्रशासकीय ठराव मंजुर.

(एस.एस.गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल.बी.पाटिल)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि;नागपूर.

## प्रशासकीय ठराव दिनांक १६.१०.२००२

**विषय क्रमांक १ :** बँकेतील कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक १ :** महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटिव्ह बँक एम्प्लाईज युनियन, नागपूर यांनी बँकेतील सर्वच कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी दरवर्षीप्रमाणे देण्यांत यावी अशी विनंती केली आहे. दरवर्षी बँकेतील कर्मचाऱ्यांना दिवाळी पेशगी देण्यांत येत असते व ही पेशगीची रक्कम कर्मचाऱ्यांचे दरमहा पगारातून समान १० हप्त्यांत वसुल करून घेतली जात असते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा पेशगी करिता अर्ज करणाऱ्या बँकेतील कायम व नियमित कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त खालीलप्रमाणे पेशगी नेहमीचे अटीवर देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

अ) लिपिक व अधिकारी श्रेणी रूपये ५०००/- प्रतिकर्मचारी

ब) ड्रायव्हर व शिपाई श्रेणी --- रूपये ४०००/- प्रतिकर्मचारी

सदर पेशगीचे वाटप दिवाळीपूर्वी म्हणजे दिनांक १९.१०.२००२ पासून दिनांक ३१.१०.२००२ पर्यंत करण्यांत यावे. यानंतर या कारणाकरिता पेशगी मिळणार नाही. सदर पेशगीची वसुली माहे नोव्हेंबर २००२चे पगारापासून समान १० मासीक हप्त्यांत करण्यांत यावी. इतर अटी नेहमीच्याच राहतील असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

**विषय क्रमांक २:** बँकेचे वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी वकिलांकडून आलेल्या अर्जावर विचार करणे.

**ठराव क्रमांक २:** बँकेचे वकिलांचे पॅनेलवर नियुक्तीसाठी ॲड सुधाकर ठमके, रेशिमबाग, नागपूर व ॲड. नितीन खांबोरकर, गांधीनगर नागपूर यांनी बँकेला विनंती अर्ज केले आहे. त्यांच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे ॲड सुधाकर ठमके यांना मागील १२ वर्षाचा मुख्यत्वे कोऑपरेटिव्ह कोर्ट, सिव्हील कोर्ट, लेबर कोर्ट इ.चा वकिली व्यवसायाचा अनुभव आहे. तसेच ॲड. नितीन खांबोरकर यांना वकिली व्यवसायाचा ११ वर्षाचा अनुभव असून ते मुख्यत्वे उच्च न्यायालय, सिव्हील कोर्ट,

चॅरिटी संबंधीच्या केसेस चालवित असून ते अनेक ठिकाणी पॅनेलवर कार्यरत आहेत. त्यांच्या अर्जाचा विचार करता त्यांना बॅकेच्या पॅनेलवर नियुक्त केल्यास बॅकेच्या सहकार न्यायालयातील तसेच उच्च न्यायालयातील केसेस त्यांचेकडे सोपविता येतील. त्यामुळे वरील आलेल्या अर्जाचा विचार करुन श्री सुधाकर ठमके व श्री नितिन खांबोरकर ॲडव्होकेट यांना बॅकेच्या पॅनेलवर वकिल म्हणून नियुक्त करण्यांत येत आहे. त्यांना ह्याबाबत लेखी कळवून बॅकेच्या विरोधांत कोणत्याही केसेस दाव्यामध्ये त्यांनी काम करु नये अशा अटीवर त्यांना बॅकेच्या पॅनेलवर घेण्यास मान्यता असून वरील प्रशासकीय ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

(एस. एस. गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल. बी. पाटील)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बॅक लि, नागपूर.

(६७)

## प्रशासकीय ठराव दिनांक १९।१०।२००२

**विषय क्रमांक १ :** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, उपप्रादेशिक कार्यालय, रामटेक यांना सन २००२-०३ करिता शेतमाल/ वन उपज / धान खरेदीकरिता हुंडी डिस्काउंट लिमीट मंजुरीबाबत.

**ठराव क्रमांक १ :** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, उपप्रादेशिक, कार्यालय रामटेक अंतर्गत त्यांच्या सहा उपखरेदी केंद्राकरिता सन २००२-२००३ साठी शेतमाल/वनउपज / धान खरेदीकरिता हुंडी डिस्काउंट लिमीट मागणी अर्ज प्राप्त झाला. त्यावर प्रशासकीय निर्णय होऊन रामटेक उपप्रादेशिक कार्यालया अंतर्गत खालील ६ उपकेंद्रांना हुंडी डिस्काउंट लिमीट रुपये १५.०० लाख खालील अटीवर मंजुर करण्यात आल्या.

विशेष अट - महामंडळाने त्यांचे दिनांक २२.१०.२००२ रोजी ठरलेल्या संचालक मंडळाचे हुंडी डिस्काउंट लिमीट मंजुरीबाबतची ठरावाची प्रत बँकेला सादर केल्यावरच मंजुर मर्यादेवर उचल देण्यांत येईल.

| अ.क्र. | शाखा | केंद्र | मंजुर हुंडी डिस्काउंट मर्यादा | मुदत. |
|---|---|---|---|---|
| १. | पवनी | पवनी | २.०० | 30.09.2003 |
| २ | पवनी | हिवरा बाजार | २.०० | ,, |
| 3. | देवलापार | बेलदा | २.०० | ,, |
| ४. | देवलापार | देवलापार | २.०० | ,, |
| ५. | मनसर | मनसर | ५.०० | ,, |
| ६. | रामटेक | शिवनी | २.०० | ,, |
| | | | १५.०० | |

### प्रशासकीय ठराव मंजुर

| | |
|---|---|
| (सही) | (सही) |
| (एस.एस.गोंड) | (एल.बी.पाटील) |
| प्रभारी व्यवस्थापक | प्रशासक |

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक म. नागपूर.

प्रशासकीय ठराव दिनांक २१.१०.२००२

विषय क्रमांक १ : शासकीय कर्जरोखे खरेदी विक्री व्यवहारासाठी राज्य बँक स्तरावर स्वतंत्र खाते (Designated Fund Account) उघडणे बाबत.

ठराव क्रमांक १ : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय यांचेकडे शासकीय कर्जरोखे खरेदी विक्री व्यवहारासाठी रिझर्व बँक परिपत्रक क्रमांक पीडीओ/१२.०१.२००२/६५१/२००२-०३ दिनांक ६.८.२००२ व यु.बी.डी./बी.आर./४७/१६.२६.००/२००१-०२ दिनांक ७.६.२००२ नुसार स्वतंत्र खाते (Designated Fund Account) उघडण्यात यावे, असा प्रशासकीय ठराव घेण्यात आला आहे.

प्रशासकीय ठराव मंजुर

(एस.एस.गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल.बी.पाचिले)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि., नागपूर

प्रशासकीय ठराव दिनांक २२.१०.२००२

विषय क्रमांक १: शेती संस्थांना त्यांचे सभासद व्याज गाळा रकमेतून ३% मार्जीन जॉईंट फंड भरण्याकरिता रक्कम रुपये २०.०० लाख वळती करण्याबाबत.

ठराव क्रमांक १: नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटीव्ह सोसायटी लि. नागपूर या संस्थेने ३५१ संस्थांचे सभासदांकडून वसूल झालेल्या सभासद व्याज गाळा रुपये १३४.७८ लाख रकमेतून जॉईंट फंड भरण्याकरिता मागणी केल्याप्रमाणे खालील जाईंट फंड खालाला प्रशासकीय ठरावानुसार वळती केलेली आहे.

| प्रशासकीय ठरावाची तारिख | जॉईंट फंडात वळती केलेली तारिख | रक्कम (रुपये लाखांत) |
|---|---|---|
| २०.५.२००२ | २२.५.२००२ | १३.५० |
| १०.६.२००२ | १४.६.२००२ | १३.०० |
| ६.७.२००२ | ६.७.२००२ | १३.६३ |
| २७.७.२००२ | १.८.२००२ | १४.४५ |
| २७.८.२००२ | ३०.८.२००२ | १३.६४ |
| २७.९.२००२ | २७.९.२००२ | १३.३७ |
| एकूण | | ८१.५९ |

संस्थेचे जाईंट फंड खालाला वरील प्रमाणे रुपये ८१.५९ लाख वळती केल्यानंतर रुपये ५३.१९ लाख बाकी आहे. संस्थेने दिनांक १८.१०.2002 रोजी पत्र देऊन उर्वरित सभासद व्याज गाळा रकमेतून कर्मचाऱ्यांना दिवाळी सन लक्षांत घेऊन बोनस / सानुग्रह अनुदान १२ टक्के देण्यासाठी त्याचप्रमाणे दिवाळी ॲडव्हान्स देण्यास रक्कम उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती केली आहे. याकरिता खालील प्रमाणे प्रशासकीय ठराव घेण्यांत आला.

– प्रशासकीय ठराव –

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सुपरविजन कोऑपरेटिव्ह सोसायटी लि. नागपूर या संस्थेनी शेती सेवा संस्थांचे सभासदांकडून वसूल झालेल्या रकमेपैकी बँकेकडे असलेल्या प्रकरणांतील रुपये ५३.१९ लाखामधून

व्याज गाळा रकमेतून दिवाळी सण लक्षांत घेऊन बोनस / सानुग्रह अनुदान १२.२% ला त्याचप्रमाणे दिवाळी ॲडव्हान्स देण्याकरिता जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास दिनांक १६.१०.२००२ चे पत्राप्रमाणे विनंती केली आहे. गटसचिवांची कर्ज वसुली व कर्ज वाटपातील महत्वाची कामगिरी लक्षांत घेता गटसचिवांना दिवाळी सण लक्षांत घेऊन बोनस / सानुग्रह अनुदान १२.२% ला त्याचप्रमाणे दिवाळी ॲडव्हान्स देण्यासाठी रुपये २०.०० लाखाची सभासद व्याज गाळा रक्कम जॉईंट फंड खात्याला वळती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजूर

विषय क्रमांक २: श्री इंद्रजीत तिवारी, चपराशी यांचा प्रोबेशन कालावधी पूर्ण झाल्याने नोकरीत कायम करणेबाबत निर्णय घेणे.

ठराव क्रमांक २: श्री इंद्रजीत तिवारी, चपराशी यांचा एक वर्षाचा प्रोबेशन कालावधी दिनांक ३०.९.२००२ रोजी संपला आहे. प्रोबेशन कालावधीतील त्यांचे कामकाज समाधानकारक असल्याने व त्यांचा प्रोबेशन कालावधी पूर्ण झाल्याने रुपये १८०-८-२४५-९-२६०-११-३४५-१३-३८० या वेतनश्रेणीत दिनांक १.१०.२००२ पासून बँकेचे नोकरीत चपराशी पदावर कायम करण्यांत येत आहे.

प्रशासकीय ठराव मंजूर

(एस. एस. गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल. बी. पाथोडे)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर

## प्रशासकीय ठराव दिनांक २३.१०.२००२

**विषय क्रमांक १ :** बँक कर्मचाऱ्यांकडून दुचाकी वाहन खरेदीसाठी आलेल्या कर्जमागणी अर्जाबाबत.

**ठराव क्रमांक १ :** बँक कर्मचाऱ्याकडून दुचाकी वाहन खरेदीसाठी आलेल्या कर्जमागणी अर्जावर निर्णय होऊन, बँकेचे कर्ज धोरणाप्रमाणे बँक कर्मचाऱ्यांना वाहन खरेदीसाठी कार्यालयीन शिफारशीनुसार खालीलप्रमाणे कर्ज मंजूर करण्यांत आले.

| अं.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | शाखा | मेक | मंजूर कर्ज रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. पी.यु. अंड्सकर | कळमना बाजार | हिरोहोंडा अॅम्बिशन | ३५०००/- |
| २. | " पी.बी. उबरे | नरखेड | बजाज स्कुटी | २६२००/- |
| ३. | " पी.एम. आदमने | हनुमाननगर | हिरोहोंडा स्प्लेंडर | ३९९००/- |
| ४. | श्रीमती एम.व्ही. रेरवडे | हिंगणा | यामहा | ४४५००/- |
| | एकूण. | - | - | १४५६००/- |

कर्ज रक्कम अदा करतांना प्रत्येक कर्जदाराने दोन जामिन द्यावेत अशी अट घालावी.

प्रशासकीय ठराव मंजूर.

(स्वाक्षरी)
(एस.एस. गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(स्वाक्षरी)
(एल.बी. पाटील)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑपरेटीव्ह बँक लि; नागपूर.

(61)

## प्रशासकीय ठराव दिनांक २४.१०.२००२

**विषय क्रमांक १ :** हातमाग विणकर सहकारी संस्थांकडून सन २००२-२००३ करिता आलेल्या कर्जमर्यादा नुतनीकरण मागणी अर्जाबाबत.

**ठराव क्रमांक १ :** हातमाग विणकर सहकारी संस्थाकडून सन २००२-२००३ करिता आलेल्या पत मर्यादा नुतणीकरण मागणी अर्जावर निर्णय होउन, बँकेचे कर्ज धोरणानुसार पत मर्यादा नुतनीकरणाचे निकषांची पुर्तता झाली असल्याने खालील हातमाग विणकर सहकारी संस्थांना मागील वर्षासाठी मंजुर असलेल्या पत मर्यादेइतपत रकमेचे सन २००२-२००३ करिता कार्यालयीन शिफारशीनुसार नोंदणीच्या अटीवर दिनांक ३१.३.२००३ पर्यंतचे मुदतीसाठी नुतणीकरण मंजुर करण्यांत येत आहे.

(रक्कम लाखांत)

| अ.क्र. | संस्थेचे नांव | सन 2002-03 करिता नुतणीकरण मंजुर मर्यादा. |
|---|---|---|
| १. | आझाद कारपेट हातमाग विणकर सह. संस्था मर्या., नागपूर | १.०० |
| २. | ब्राम्हणी हातमाग विणकर सह. संस्था मर्या., कळमेश्वर | १.०० |
| ३. | वाकोडी हातमाग विणकर सह. संस्था मर्या., वाकोडी | ०.५० |
| | एकुण | २.५० |

**प्रशासकीय ठराव मंजुर.**

(एस. एस. गोडे)
प्रभारी व्यवस्थापक

(एल. बी. पाटील)
प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक म. नागपूर.

## प्रशासकीय ठराव दिनांक २६.१०.२००२

विषय क्रमांक १ : बँकेचे सभासदत्व मिळणेबाबत निर्मल अर्बन कोऑपरेटीव्ह बँक लि., नागपूर या नागरी बँकेचे आलेल्या अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १ : निर्मल अर्बन कोऑपरेटीव्ह बँक लि.,नागपूर या नागरी सहकारी बँकेने आपल्या बँकेचे सभासदत्व मिळणेकरिता अर्ज सादर केलेला आहे. सदर नागरी सहकारी बँकेची नोंदणी सहकारी कायद्यानुसार झालेली आहे. नोंदणी क्रमांक-एन.जी.पी./सीटीवाय-१/बीएनके/ओ./३१०/९८ दिनांक ८।४।१९९६ हा आहे. बँक व्यवस्थीत सुरु असून सभासदत्वासाठी आवश्यक शेअर्सची खरेदी व प्रवेश फी एकूण रुपये १०००२/- रकमेचा मुख्य कार्यालय, नागपूर येथे चेकद्वारे भरणा दिनांक २२।१०।२००२ ला केलेला आहे. सुरुवातीला आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता केल्यामुळे निर्मल अर्बन कोऑपरेटीव्ह बँक लि., नागपूर या संस्थेला बँकेचे सभासद करुन घेण्यांत यावे असे ठरले.

प्रशासकीय ठराव मंजुर

---

(सही) (सही)

(एस.एस.गोडे) (एल.बी.पाटील)

प्रभारी व्यवस्थापक प्रशासक

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप.बँक लि.,नागपूर.

(63)

## प्रशासकिय ठराव दिनांक २८.१०.२००२

विषय क्रमांक १ : निवृत्तीवेतन धारकांसाठी वैयक्तीक कामाकरिता कर्ज मंजुरीबाबत आलेल्या कर्ज मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक १ : ज्या निवृत्त कर्मचाऱ्याचे निवृत्तीवेतन आपले बँकेमार्फत अदा करण्यांत येते, त्या निवृत्तीवेतन धारकांना त्यांचे निवृत्त वेतनाची सहा महिण्याचे सरासरीचे सहा पट किंवा जास्तीत जास्त रुपये ३०,०००/- पर्यंत त्यांचे वैयक्तीक कामाकरिता मुदती कर्ज मंजुर करण्यांत येते. तरी त्यानुसार खालिल प्रमाणे कर्ज प्रकरणाला मंजुरी देण्यांत आली आहे. तरी त्यानुसार प्रशासकिय ठराव करण्यांत येत आहे.

- प्रशासकिय ठराव -

निवृत्तीवेतन धारकांसाठी त्यांचे वैयक्तीक कामाकरिता कळमना शाखेमार्फत श्री विठ्ठल नारायणराव कोल्हे, यांचा रुपये २४०००/- चा कर्ज मागणी अर्ज प्राप्त झाला. सभासदाने बँक कर्ज धोरणाप्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असल्यामुळे सभासदांना मुदती कर्ज रुपये २१०००/- फक्त २४ मासीक हप्त्यांत व्याजासह वसुल करण्यास्तव कार्यालयीन शिफारशीनुसार नेहमीचे अटीवर कर्ज मंजुर करण्यांत आले.

प्रशासकिय ठराव मंजुर

---

विषय क्रमांक २ : तज्ञ समितीने सन २००३-२००४ हंगामाकरिता शिफारस केलेले पिक कर्जाचे एकरी दर व धोरण मंजुर करुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई यांचेकडे मान्यते साठी पाठविणे.

ठराव क्रमांक २ : सन २००३-२००४ च्या हंगामाकरिता नागपूर जिल्ह्यातील पिक कर्ज दर ठरविण्याकरिता तज्ञ समितीची सभा दिनांक २५.१०.२००२ रोजी घेण्यांत आली. या सभेत बियाणे, औषधी व खताचे वाढलेले भाव तसेच दिवसेंदिवस मजुरीचे दरांत झालेली वाढ याबाबत विचार करुन धान ओलीत, ज्वारी ओलीत, ऊस भुईमुग कोरड, सोयाबीन कोरड

व गहू ओलीत या पिकाचे वस्तुरूपाचे कर्जदरांत वाढ करण्यांत आली.

तज्ञ समितीने खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या २००३-२००४ च्या हंगामाकरिता पिक कर्जाचे एकरी दर व धोरणास प्रशासकीय ठरवाद्वारे मंजुरी देण्यांत आली असून हे दर मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई यांचेकडे मंजुरीकरिता पाठवावे असे ठरले.

| अ. क्र. | पिकाचे नांव | तज्ञसमितीने शिफारस केलेले एकरी दर २००३-२००४ | | | मा. प्रशासकीय ठरावानुसार मंजुर केलेले एकरी दर २००३-२००४ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नगदी | वस्तू | एकुण | नगदी | वस्तू | एकुण. |
